# श्री. हरिभाऊ भानूजी अरेलकर

सेवक क्र. ८३४ मु. जोगीठाणापेठ, उमरेड, जि. नागपूर

मी या मार्गावर येण्यापूर्वी अतिशय दारु पीत होतो. मला दारुचे व्यसन एवढे होते की सकाळी चहा घेण्याच्याऐवजी मी दारुच घेत असे. सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत तासातासाने मी दारुच घेत असे. ह्या दारुच्या व्यसनात बरीच वर्षे निघून गेली. वडिलांची सर्व इस्टेट या दारुच्या व्यसनामुळे उधळून टाकली. किराणा दुकानसुध्दा दारुच्या व्यसनामुळे बंद पडले. आता आपले यापुढे काय होणार याची मला फार चिंता वाटू लागली. आपल्याला लोक काय म्हणतील या चिंतेने मला रात्रभर झोप देखील लागत नव्हती. तरी पण दारु पिणे सुरुच होते. अचानक माझ्या मनात दारु पिणे सोडून देण्याचा विचार आला. मी संतोषी मातेचे व्रत केले व तिला प्रार्थना केली. हे माते, जर तू माझे दारुचे व्यसन तोडशील तर मी तुझे मंदिर बांधून तुझी सेवा करीन. काही दिवस व्रत केल्यावर काहीच फायदा झाला नाही. त्यानंतर मी शंकर भगवानची आराधना केली. माझे दारु पिणे बंद होईल तर मी दर महिन्याला शिवरात्रीचा उपवास करीन असा संकल्प केला पण त्यातही मला यश आले नाही. त्यानंतर मला एकदा बाबा हनुमानजीच्या मार्गावरच्या पंधरवाडी चर्चाबैठकीत जाण्याचा योग आला. या मार्गाचे सेवक श्री. प्रेमाजी शेटे यांच्याबरोबर श्री. केशवराव चिचघरे यांच्याकडे बैठकीसाठी दारु पिऊन गेलो. ह्या बैठकीमध्ये सेवक बाबांच्या मार्गदर्शनाबद्दल चर्चा करीत होते. मी त्याचे मार्गदर्शन ऐकले. असे काही दिवस गेले. माझा दारुचा छंद चालुच होता. दारु बंद करण्याचा प्रयत्न करीत होतो पण मला यश येत नव्हते. रात्रभर झोप लागत नव्हती. नंतर मी माझ्या मनात निश्चय केला की आता आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय नाही. मी आत्महत्या करण्याकरिता श्री. देवीकर यांची विहीरसुध्दा निवडून ठेवली होती.

एके दिवशी मला श्री. अर्जुन मोहाडीकर यांच्या घरी जाण्याचा योग आला. तेथेही मी दारु पिऊनच गेलो. श्री. अर्जुन मोहाडीकर यांना मी म्हणालो, मला तुमच्या मार्गावर यायचे आहे. तुमचे बाबा माझी दारु बंद करुन देतील काय? त्यावर श्री. अर्जुनराव मोहाडीकर म्हणाले, ''दारु पिणाऱ्याला आमचे बाबा मार्गच देत नाहीत. तेव्हा तुला प्रथम दारु सोडावी लागेल.'' मी म्हणालो, ''माझी दारु कोणत्याच हालतीत सुटू शकत नाही.'' तेव्हा अर्जुन म्हणाले तर मग तुला आमचे बाबा मार्ग देऊ

शकणार नाही. त्यानंतर मी तिथून निघून गेलो. दुकानाम जाऊन दारु पिऊनच घरी परत आलो. घरी आल्यावर हातपाय धुऊन तिथे आमच्या घरी कुलदेवतेची पुजा करीत होतो तिथे जाऊन सर्व फोटो काढून टाकले व म्हणालो, आजपासून मी कुलदेवतेची पूजा करणार नाही आणि तिथेच बसून कापूर लावून भगवान बाबा हनुमानजीला मी विनंती केली, हे भगवान! दारु सुटावी यासाठी मी फार प्रयत्न करीत आहे पण मला त्यात यश येत नाही. जस तुम्ही माझी दारु बंद करणार नाही तर मी ह्या गावातील सेवकांना व लोकांना हे भगवान खोटे आहेत व ते फसवतात अशी बदनामी करीन. जर ह्या मार्गावर सत्य भगवान आहे असे सेवक म्हणतात आणि खरोखरच जर सत्य भगवान असेल तर जेव्हा जेव्हा मी दारु पिण्याकरिता दुकानात जाईल तेव्हा तेव्हा मला दारुचा स्पर्शही होऊ देऊ नये.

दुसऱ्या दिवशी सकाळी दारु पिण्याकरिता नित्याप्रमाणे दुकानात गेलो. दारुचा ग्लास हातात घेण्यासाठी समोर गेलो तर मला ओकारी होत आहे असे वाटले. मी थोडा वेळ बाहेर गेलो. पुन्हा ग्लास घेण्यासाठी दुकानात गेलो. ग्लास उचलण्यासाठी समोर होताच मला एकदम उलटी झाली. त्यावेळी मी दारु पिऊ शकलो नाही. पैसे देऊन मी घरी परत आलो. घरी आल्यानंतर पुन्हा भगवंताला विनंती केली, बाबा मी पुनः दारु पिण्यास जात आहे. मी दुकानात जाण्यास निघालो पण भगवान सत्य आहे. बाबाने मला दुकानाच्या आत जाऊच दिले नाही. जाण्याच्या आधीच मला ओकारी होऊ लागली. नंतर मी समजून गेलो की आता बाबांनी माझे दारु पिणे बंद करुन दिले आहे आणि त्या दिवसापासून मी एक भगवान बाबा हनुमानजीलाच मानू लागलो. असे चार महिन्यापर्यंत मी स्वतःच आपल्या मनाने बाबा हनुमानजीच्या नावाने राहिलो.

एक दिवस श्री. प्रेमाजी शेटे यांच्याकडे गेलो व त्यांना वरील घडामोडीबद्दल माहिती दिली. माझी दारु पुर्णपणे सुटली. आता मला ह्या मार्गावर यायचे आहे. श्री. प्रेमाजी शेटे यांनी मला श्री. नारायणराव चिचघरे यांच्याकडे नेले. त्यांना पण मी वरीलप्रमाणे घडलेली हकीगत सांगितली. नारायणराव चिचघरे यांनी मला अकरा दिवयांचे त्यागाचे कार्य दिले. त्यानंतर तीन महिने साधे कार्य केले. वरील कार्य संपल्यानंतर लगेच मला बेचाळीस दिवसांचे त्यागाचे कार्य मिळाले आणि महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या उपस्थितीत हवन कार्याने समाप्ती झाली. कार्याच्या समाप्तीनंतर बंद केलेले किराना दुकान पुनःचालू केले आणि त्यामध्ये मला अतिशय योग मिळून आज मोठे दुकान महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या कृपेने चालत आहे. अशा कृपेला मी जीवनात सांभाळून ठेवीन.

* * * * *